दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | मंगळवार दि.१९ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २५६ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Tuesday 19 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 256 | Pages 4 | Rate 4 Rs


### 'लालपरी'चा प्रवास महागणार

**मुंबई**–जागतिक पातळीवरील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या तणावाचा फटका आता सर्वसामान्यांची वाहिनी असलेल्या 'एसटी बस'ला बसण्याची शक्यता आहे. देशातील इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाच्या तिकिटात वाढ होणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. या गंभीर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत परिवहन मंत्र्यांनी भविष्यातील तिकीट दरवाढीचे स्पष्ट संकेत दिले आहेत; मात्र ही भाडेवाढ तातडीने लागू होणार नसल्याने प्रवाशांना तूर्तास दिलासा मिळाला आहे.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत बोलताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे महामंडळाच्या तिजोरीवर पडणाऱ्या आर्थिक भाराची आकडेवारी स्पष्ट केली.

# शिक्षण व्यवस्थेचा दलाल अखेर केंद्रीय तपास यंत्रणेच्या जाळ्यात

## आरसीसी शिकवणीचे संचालक शिवराज मोटेगावकर याला ९ दिवसांची कोठडी

### वैद्यकीय प्रवेश परीक्षा प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणाने देशभरात संताप

दैनिक वादळ वार्ता
**लातूर । प्रतिनिधी**

देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणात केंद्रीय तपास यंत्रणेने मोठी कारवाई करत लातूर येथील आरसीसी शिकवणीचे संचालक शिवराज मोटेगावकर याला अटक केली आहे. या कारवाईमुळे राज्यातील खासगी शिकवणी विश्वात मोठी खळबळ उडाली असून शिक्षण क्षेत्रातील गैरप्रकार पुन्हा एकदा समोर आले आहेत.केंद्रीय तपास यंत्रणेने मोटेगावकर याला पुण्यातून ताब्यात घेतल्यानंतर दिल्ली येथील न्यायालयात हजर केले.
तपासासाठी दहा दिवसांची कोठडी मागण्यात आली होती. मात्र न्यायालयाने त्याला नऊ दिवसांची कोठडी सुनावली.माहितीनुसार, मोटेगावकर याची यापूर्वी अनेक तास कसून चौकशी करण्यात आली होती. चौकशीदरम्यान अनेक धक्कादायक माहिती समोर आल्यानंतर अखेर अटकेची कारवाई करण्यात आली. या प्रकरणात यापूर्वीच नऊ आरोपींना अटक झाली असून आता आरोपींची संख्या दहावर पोहोचली आहे.वैद्यकीय प्रवेश परीक्षा तीन मे रोजी पार पडली होती. मात्र प्रश्नपत्रिका फुटल्याचे समोर आल्यानंतर राष्ट्रीय परीक्षा संस्थेला परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घ्यावा लागला. आता ही परीक्षा पुन्हा नव्याने घेण्यात येणार असल्याने लाखो विद्यार्थी आणि पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.ग्रामीण भागातील अनेक गरीब व मध्यमवर्गीय पालकांनी कर्ज काढून आपल्या मुलांना महागड्या शिकवणी वर्गात प्रवेश दिला. काही ठिकाणी लाखो रुपये शुल्क आकारण्यात आले. यशाची हमी देत विद्यार्थ्यांच्या भविष्याचा व्यापार करणाऱ्या अनेक शिकवणी संस्थांमुळे पालक आर्थिक संकटात सापडले आहेत.



### पैसे उकळणाऱ्या असंख्य शिकवणी संस्थांवर कारवाई कधी?

विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या नावाखाली लाखो रुपये उकळणाऱ्या अनेक शिकवणी संस्था आजही खुलेआम सुरू आहेत. गुणवत्तेपेक्षा पैशाला महत्त्व देत विद्यार्थ्यांवर मानसिक दबाव टाकला जात आहे. प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणामुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असताना, अशा शिकवणी संस्थांची चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी आता जनतेतून जोर धरू लागली आहे.

### दलालांमुळे देशाचे भविष्य धोक्यात!

शिक्षण क्षेत्रात वाढलेल्या दलाल आणि गैरप्रकारांमुळे मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. पैशाच्या जोरावर यश विकत घेण्याची प्रवृत्ती वाढत असल्याने देशाची शैक्षणिक व्यवस्था बदनाम होत आहे. गुणवत्तेचा गळा घोटणाऱ्या शिक्षण माफियांवर कठोर शिक्षा झाली पाहिजे,अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून व्यक्त होत आहे.



# दुबईच्या स्वस्त सोन्याच्या आमिषाने सोनाराला ३ लाखांचा गंडा; पळणाऱ्या दरोडेखोरांचा अपघात अन् थेट बेड्या!

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दुबईहून छुप्या मार्गाने आणलेले सोने बाजार भावापेक्षा स्वस्त दरात देण्याचे आमिष दाखवून एका सोनाराला भरदिवसा लुटल्याचा धक्कादायक प्रकार केज येथे घडला आहे.मात्र, 'बुरा काम का बुरा नतीजा' या उक्तीप्रमाणे, सोनाराला लुटून सुसाट पळणाऱ्या दरोडेखोरांच्या गाडीला काही अंतरावरच भीषण अपघात झाला.नियतीने त्यांना थेट पोलिसांच्या स्वाधीन केले असून, याप्रकरणी केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पाच हजार रुपये प्रति तोळा स्वस्त सोन्याचे आमिष**

मिळालेल्या माहिती नुसार,माजलगाव तालुक्यातील टाकळगव्हाण येथील व्यावसायिक दत्तात्रय रामेश्वर काकडे यांना 'अमोल शिंदे' नावाच्या एका व्यक्तीने व्हॉट्सप वर संपर्क साधला होता. त्याने काकडे यांना दुबईचे सोने प्रति तोळा पाच हजार रुपयांनी स्वस्त देण्याचे आमिष दाखवले.या आमिषाला भुलून काकडे आपल्या कारागिरासह पैसे घेऊन केज-बीड रस्त्यावरील गंगा माऊली साखर कारखान्यासमोरील एका शाळेजवळ पोहोचले.



लोखंडी रॉडने बेदम मारहाण करत ३ लाख लुटले.त्या ठिकाणी आरोपींनी काकडे यांना पिवळा धातू दाखवून विश्वासात घेण्याचा प्रयत्न केला.त्यानंतर अचानक काकडे यांच्या कारागिराकडील पैशांची बॅग जबरदस्तीने हिसकावून घेतली. काकडे यांनी याला कडाडून प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता,आरोपींनी त्यांना लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली आणि त्यांचा मोबाईलही फोडून टाकला.दरोडेखोरांनी बॅगेतील ५०० रुपयांच्या नोटांचे ६ बंडल म्हणजेच एकूण ३ लाख रुपये काढून घेतले आणि रिकामी बॅग फेकून देऊन तेथून पळ काढला.

**पळताना अपघात, पोलिसांच्या जाळ्यात**

घटनेनंतर काकडे यांनी तात्काळ दरोडेखोरांचा मागोवा घेणे सुरू केले. काही अंतरावर असलेल्या टाकळी फाटा येथे दरोडेखोरांच्या वाहनाचा अपघात झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अपघातस्थळी आधीच पोलीस हजर होते. काकडे यांनी जवळ जाऊन पाहिले असता, अपघातात जखमी झालेले इसम दुसरे तिसरे कोणी नसून त्यांना लुटणारे दरोडेखोरच असल्याचे स्पष्ट झाले. आरोपींची खरी नावे निष्पन्न अमोल शिंदे हे खोटे नाव सांगून फसवणूक करणाऱ्या या दोन्ही आरोपींची खरी नावे पोलिसांनी निष्पन्न केली आहेत:
दशरथ उर्फ अप्पा शिवाजी शिंदे,विशाल रामकिशन शिंदे दोघे रा. मांडवा,जि. धाराशिव या चित्रपटाच्या कथेलाही लाजवणाऱ्या गुन्ह्याचा पुढील तपास केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप रामराव मांजरमे हे करत आहेत.

# श्री साईभक्त पवन गादेवार यांच्या घरी साईबाबा पादुका दर्शन सोहळा संपन्न



दैनिक वादळ वार्ता
**नायगांव । प्रतिनिधी**

नांदेडच्या नायगाव शहरातील युवा उद्योजक पवन गादेवार सर यांच्या घरी आज दिनांक १७ मे रोजी श्री साईबाबा पादुका दर्शन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला साईबाबा मंदिर विश्वस्ताकडून दर रविवारी पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात येते यानिमित्ताने साईबाबा चरण पादुका अभिषेक आरती व भव्य महाप्रसाद नांदेड येथील प्रसिद्ध तिवारी साई भजन संध्या प्रस्तुत रातभर भव्यदिव्य भजन गीताचा कार्यक्रम संपन्न झाला यात धर्माबाद येथील गायक तसेच पवन गादेवार सर या सर अनेकांनी सुंदर भजन संध्या गाऊन भाविकांना मंत्रमुग्ध केले
व साई दरबार भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन सेवानिवृत्त मुख्याध्यापक मनोहर गादेवार सर यांच्या वतीने करण्यात आलं होतं यावेळी साईबाबा मंदिराचे पुजारी साईनाथ महाराज नायगाव नगरपंचायत च्या उपनगराध्यक्ष प्रतिनिधी कविताताई विजय पाटील युवा उद्योजक पवन गादेवार यासह सर्व साईबाबा मंदिराचे सेवेकरी शहरातील उद्योजक व्यापारी विविध क्षेत्रातील मान्यवर परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते

# शेळगाव (नृसिंह) येथे मांजरा नदी पात्रातून अवैध वाळू उपसा जोमाने महसूल प्रशासनाचे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष?

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे शेळगाव (नृसिंह) येथे मांजरा नदी पात्रातून अनेक ट्रॅक्टरच्या साहाय्याने सर्रासपणे अवैध वाळू उपसा आणि वाहतूक सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, या गंभीर प्रकाराकडे संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार आणि उपजिल्हाधिकारी यांचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.
तक्रारींनंतरही कारवाई शून्य..? अधिकाऱ्यांना पत्रकारांच्या फोनची 'लर्जी' स्थानिक नागरिकांनी या अवैध वाळू वाहतुकीबाबत संबंधित महसूल विभागाला वारंवार कल्पना दिली आहे. मात्र, माहिती देऊनही अद्याप प्रशासनाकडून कोणतीही चौकशी किंवा कारवाई करण्यात आलेली नाही. धक्कादायक बाब म्हणजे, या गंभीर प्रकरणाची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी आणि प्रशासनाची बाजू ऐकण्यासाठी स्थानिक पत्रकारांनी संबंधित तलाठी आणि तहसीलदार यांना वारंवार फोन केले. मात्र, या जबाबदार अधिकाऱ्यांनी फोन उचलण्याचे सौजन्यही दाखवले नाही. वाळू उपशाबाबत विचारणा करण्यासाठी फोन केला की या अधिकाऱ्यांना जणू 'लर्जी' होते, असाच संतापजनक अनुभव येत आहे. त्यामुळे महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी वाळू माफियांशी 'हातमिळवणी' करून आपले 'हात ओले' केले आहेत का? असा थेट सवाल आता उपस्थित केला जात आहे.नागरिकांमधून कठोर कारवाईची मागणीशासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून आणि शासकीय नियमांची पायमल्ली करून नदीचे पात्र पोखरणाऱ्या या वाळू माफियांवर तसेच त्यांना पाठीशी घालत पत्रकारांचे फोन टाळणाऱ्या संबंधित कामचुकार अधिकाऱ्यांवर वरिष्ठ पातळीवरून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेळगाव (नृसिंह) येथील संतप्त नागरिकांमधून होत आहे. आता या बेजबाबदार प्रशासनावर जिल्हाधिकारी काय पाऊल उचलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# संपादकीय

## चिंताजनक ‘हवा’



पश्चिम आशियातील युद्धाचे ढग पुरते विरळ झालेले नसताना आणि त्यामुळे इंधन संकटापासून अर्थव्यवस्थेपर्यंत त्याचा फटका सहन करावा लागत असताना; तसेच देशातील बहुतांश भाग चाळीस अंश तापमानाने भाजून निघत असताना, यंदा मान्सून केरळ किनारपट्टीवर तुलनेने लवकर (म्हणजे एक जूनच्या ऐवजी २६ मे रोजी) थडकणार, ही बातमी खरे तर दिलासादायक ठरायला हवी. मात्र, त्याच वेळी मान्सूनवर विपरीत परिणाम करणारा ‘एल निनो’नामक घटकही आधीच्या अंदाजापेक्षा लवकर सक्रिय होणार असल्याने दिलासा वाटण्याऐवजी चिंता वाढली आहे.जून ते सप्टेंबर दरम्यान हमखास पडणारा मोसमी पाऊस म्हणजेच मान्सून हे भारताचे ठळक वैशिष्ट्य. आजही देशाची अर्थव्यवस्था मोठ्या अंशी मान्सूनवरच अवलंबून आहे. सागरी पृष्ठभागाचे तापमान, तेथील दाब, वारा आदी विविध घटकांवर असलेला पाऊस हवामानाप्रमाणेच लहरी. त्यामुळे तो कधी जोरात बरसतो, तर कधी पाठ फिरवतो. तो जोरात झाल्यास शेतात आणि बाजारपेठेत चैतन्य निर्माण होते; अन् पुरेसा न झाल्यास तोंडचे पाणी पळते.यंदाच्या मान्सूनवर सावट आहे, ते ‘एल निनो’चे. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान वाढल्यामुळे हा घटक सक्रिय होतो आणि त्यामुळे दक्षिण अमेरिकेत अतिवृष्टीची, तर भारतात अवर्षणाची शक्यता निर्माण होते. या वर्षी ‘एल निनो’ सक्रिय होणार याची कल्पना असल्याने हवामान विभागाने आधीच ‘दीर्घकालीन सरासरी’पेक्षा कमी म्हणजे ९२ टक्के पावसाचा अंदाज वर्तविला आहे. हा ‘एल निनो’ जूनमध्येच सक्रिय होणार असल्याने आणि प्रशांत महासागराचा पृष्ठभाग दोन अंश सेल्सिअसपेक्षाही अधिक तापण्याची भीती असल्याने अवर्षणाची शक्यता आणखी वाढली आहे. त्यामुळे यंदाचा पावसाळा चिंताजनक आणि आव्हानात्मक असू शकतो.विषुवृत्तीय प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीपेक्षा ०.५ अंश सेल्सिअसने अधिक असल्याकडे हवामान शास्त्रज्ञ लक्ष वेधत आहेत. हे वाढीव तापमान म्हणजे ‘एल निनो’ अपेक्षेहून अधिक लवकर सक्रिय होण्याचे लक्षण. आधीच्या वर्षातील तापमान कमी होण्याचे आणि ते परत वाढण्याचे चक्र यंदा अधिक वेगाने फिरत असून, ही असामान्य घटना असल्याचे मानले जाते. याचा अर्थ ‘एल निनो’ अधिक तीव्र असणार. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान १.५ अंश सेल्सिअसहून अधिक झाल्यास ‘एल निनो’ तीव्र झाला, असे मानले जाते. त्या स्थितीस ‘सुपर एल निनो’ही म्हणतात.ही घटना प्रशांत महासागरातील असली, तरी तिचे हवामानशास्त्रीय परिणाम साऱ्या जगावर होतात. यामुळे दक्षिण अमेरिकी देशांत अतिवृष्टी होऊन पूर येण्याची, त्यात पिके वाहण्याची आणि मानवी संकट गडद होण्याची भीती असते; तर भारतात मोसमी पाऊस कमी होतो, अनेक ठिकाणी तो बरसतच नाही, तापमान वाढते; त्यामुळे पाण्याच्या दुर्भिक्ष्याची, पिके न येण्याची आणि महागाईची शक्यता अधिक असते. या शक्यता लक्षात घेऊन उपाययोजना आखण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे आपत्कालीन उपायांबद्दल भरभरून बोलले जात असले आणि कागदावर योजना आखल्या गेल्या असल्या, तरी प्रत्यक्षात त्यांची व्यवस्थित अंमलबजावणी होत नाही, असा आजवरचा अनुभव आहे. या पार्श्वभूमीवर ‘एल निनो’मुळे येऊ घातलेल्या संकटाकडे पाहावे लागेल.दहा वर्षांपूर्वी म्हणजे २०१५-१६ या काळात ‘एल निनो’चा प्रभाव होता आणि त्यामुळे एकूण सरासरीच्या ८६ टक्केच पाऊस झाला होता. त्या वेळी महाराष्ट्रात, विशेषत: मराठवाड्यात खूपच कमी पाऊस झाला होता. पाण्याचे मोठे संकट निर्माण झाले होते. त्या वेळी लातूरला रेल्वेने पाणी पुरवण्याची वेळ आली होती. २०२३मध्येही ‘एल निनो’ होता; त्या वेळी ऑगस्ट महिन्यातील पावसावर मोठा परिणाम झाला होता. त्या महिन्यात ३६ टक्के पाऊस कमी झाला होता. हा अनुभव लक्षात घेऊन धोरणकर्त्यांना उपाय योजावे लागतील.प्रशांत महासागराप्रमाणेच हिंदी महासागराच्या तापमानाचाही मान्सूनवर परिणाम होत असतो. हिंदी महासागराच्या पश्चिमेकडील पृष्ठभाग अधिक तापल्यास ‘इंडियन ओशिएन डायपोल’ नावाचा घटक तयार होतो आणि तो मान्सूनला पूरक असतो, असे मानले जाते. यंदा हा घटकही सक्रिय असण्याची शक्यता असल्याने थोडीफार आशादायक स्थिती आहे; परंतु प्रतिकूलतेची शक्यता गृहीत धरून, येणाऱ्या कठीण परिस्थितीवर मात करण्यासाठी पावले उचलायला हवीत.

# नवी मुंबई मध्ये प्रथम आणि लवकरच नशा मुक्त कळंबोली शहर नावारुपाली येईल-राजेंद्र कोते पाटील

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

कळंबोली शहर भारतच्या नकाशावर आशिया खंडातील सर्वात मोठे लोखंड पोलाद बाजाराचे शहर असून ओळखले जाते. त्यात मोठ्या प्रमाणात अमली पदार्थाने घुसखोरी केली होती. त्या अमली पदार्थांचे समूळ नष्ट करून निश्चितच कळंबोली शहर हे नशा मुक्त शहर म्हणून पहिल्यांदा या नवी मुंबईमध्ये पहायला मिळेल येईल असा आत्मविश्वास कळंबोली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते पाटील यांनी व्यक्त केला.नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या नेतृत्वाखाली आणि सहाय्यक पोलिस निरीक्षक विक्रांत कदम आणि अमली पदार्थ विरोधी पोलिस निरीक्षक संदीप निगडे यांच्या सहकार्यातून नशा मुक्त अभियानचे आयोजन केले होते यावेळी राजेंद्र कोते बोलत होते. त्यांनी पुढे सांगितले की कळंबोली लोखंड पोलाद बाजार हा मिनी पंजाब बनले असून पाकिस्तान मधून पंजाब मार्गे अमली पदार्थ येत आहेत. या लोखंड पोलाद बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांनी घुसखोरी केली आहे. या बाजारात देशातील विविध राज्यातून येणारे वाहन चालक, तरुण, विद्यार्थी अमली पदार्थांच्या आहारी गेले आहते. आमचा तरूण नशेच्या आहारी जाऊन बरबाद होत आहे. कुटुंबाच्या कुटुंब रस्त्यावर येत आहेत. याचा गांभीर्याने विचार करून नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नशा मुक्त




अभियान राबविण्याचा निर्णय घेतला. आणि त्याची सुरुवात प्रथम कळंबोली शहरातून झाली. अमली पदार्थ विरोधी पथकाचे संदीप निगडे याच्या मदतीने सतत दीड ते दोन वर्षांपासून नशा मुक्त कळंबोली शहर करताना ५० अटल अमली पदार्थ गुन्हेगारांना जेल मध्ये टाकण्यात आले आहे. आता काही हाताच्या बोटावर मोजण्या इतके अमली पदार्थ गुन्हेगार आहेत. त्यासाठी येथील नागरिकांनी पुढे यायला पाहिजे. त्यांच्या मदतीने येथे अमली पदार्थ तस्करी लवकरच पोलिसांच्या हाती येऊन कळंबोली शहर प्रथम नवी मुंबईतील नशा मुक्त शहर म्हणून ओळखले जाईल असा आत्मविश्वास कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते पाटील यांनी व्यक्त केला.यावेळी सहायक पोलीस निरीक्षक विक्रांत कदम यांनी सांगितले की नशेने अनेक कुटुंब उध्वस्त झाली आहेत. आपल्या तरुण पिढीला वाचवायची असेल तर नशेची किड आपल्या घरात शिरण्या अगोदर तिला ठेचून काढायची आहे. पण त्यासाठी तुम्हा नागरिकाचे सहकार्य आवश्यक आहे. ते मिळाले तर नशा मुक्त शहर करायला वेळ लागणार नाही.

**देश सेवा करण्यासाठी सीमेवर जायची गरज नाही, आपल्या परिसरातील देश विरोधी कारवाया रोखा–आमदार विक्रांत पाटील**

युवा देश म्हणून भारत देशाकडे पाहिले जाते. त्या देशातील युवांना नशेच्या आहारी लोटण्याचे प्रयत्न बाहेरील आसुरी शक्ती करत आहेत. आपल्या युवकांना अमली पदार्थांच्या माध्यमातून बरबाद करण्याचे कुटिल कारस्थान केले जात आहे. युवांना नशेपासून परावृत्त करण्यासाठी त्यांना वाचविण्यासाठी नशा मुक्त अभियान हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत आहे याचे अभिमान आहे. कळंबोली आणि परिसरातील वाढती अमली पदार्थांची तस्करी या बाबत मी चिंता व्यक्त करून यावर उपाययोजना करण्यासाठी मी नवी मुंबई पोलीस आयुक्त यांना भेटलो होतो. देशाची रक्षा करायला काही देशाच्या सीमेवर जायला पाहिजे याची गरज नाही.तर आपल्या परिसरात आपल्या आजुबाजूला होत असलेल्या देशा विरोधात कारवाया याची माहिती पोलिसाने दिली तर ही देश सेवा होईल असे त्यांनी सांगिगले.यावेळी कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कोते पाटील यांनी नशा मुक्तीची शपथ दिली. या कार्यक्रमांचे आयोजन मेडिकल असोसिएशनचे विवेक शिंदे, संजय दना सुर्वे, नितीन गावंड यांच्या प्रयत्नातून करण्यात आले होते. यासाठी निळखंड मेडिकल, कमळ मेडिकल, सिटीझन मेडिकल, उषा शंकर मेडिकल यांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमासाठी नगरसेवक रविंद्र भगत, रामदास शेवाळे, नगरसेविका सरस्वती काथारा, मोनाली ठाकूर, सायली सरक, गोपाल भगत, प्रदीप ठाकूर त्याच बरोबर विविध संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कळंबोली शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या परिसरातील किंवा आजुबाजूला काही घडत असेल आणि नशेचा विक्राळ राक्षस आपल्या घरात या परिसरात आणायचा नसेल तर ८८ २८ ११२ ११२ या हेल्पलाईंवर संपर्क साधा असे आवाहन अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलिस निरीक्षक संदीप निगडे यांनी केले आहे.

# घनश्याम गवंडी यांचा महेंद्रशेठ घरत यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन केला सन्मान!



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

शेलघरचे दिवंगत ज. आ. भगत साहेब यांचे नातू घनश्याम आत्माराम गवंडी (बाळू गवंडी) यांना पोलिस सेवेत सहायक पोलिस उपनिरीक्षक म्हणून बढती मिळाली. ते १९९४ मध्ये पोलिस सेवेत दाखल झाले. आज ३० वर्षांनंतर सहायक पोलिस उपनिरीक्षकपदी बढती मिळाल्याचे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांना समजताच शनिवारी (ता. १६ ) त्यांनी थेट घनश्याम गवंडी यांच्या पळस्पे येथील निवासस्थानी जाऊन त्यांना शाल, पुष्पगुच्छ आणि 'सुखकर्ता' पुस्तक भेट देऊन त्यांचा सन्मान केला. शेलघरचे दिवंगत ज. आ. भगत साहेब यांच्या ज्येठ कन्या सुलोचना (कृष्णाबाई) आत्माराम गवंडी (वय ८४) यांचे घनश्याम गवंडी हे पुत्र आहेत. महेंद्रशेठ घरत हे घरी आल्याने भगत साहेबांच्या कन्येला आनंद झाला. त्यामुळे भगत साहेबांच्या कन्या सुलोचनाबाई, सहायक पोलिस उपनिरीक्षक घनश्याम गवंडी आणि महेंद्रशेठ घरत हे भगत साहेबांच्या जुन्या आठवणींत रमले. महेंद्रशेठ घरत यांनी भरपूर गप्पा मारल्या आणि भगत साहेबांच्या ज्येष्ठ कन्येला शेलघर येथे येण्याची आग्रहाची विनंती केली.

# अल्पवयीन मुलीशी लग्न करून अत्याचार संगमेश्वर येथील घटनेने खळबळ

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीशी बालविवाह करून तिच्यावर अत्याचार केल्याची एक धक्कादायक घटना रत्नागिरी जिल्ह्यात उघडकीस आली आहे. या प्रकरणी २२ वर्षीय संशयित आरोपी पतीविरोधात संगमेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलगी अवघ्या १७ वर्षे १६ दिवसांची असून ती १६ आठवड्यांची गरोदर असल्याचे वैद्यकीय तपासणीत (MLC) स्पष्ट झाले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी आणि संशयित आरोपी रोहित अशोक भुटिया (वय २२, मूळ रा. दिवळिया, जि. सुरेंद्रनगर, गुजरात, सध्या रा. रत्नागिरी) हे एकाच समाजातील आहेत. मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असतानाही संशयित आरोपीने तिच्या संमतीविना वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवले.

भीतीपोटी आधी पोलिसांना दिली खोटी माहितीसदर पीडित मुलगी गरोदर राहिल्याने हा प्रकार समोर आला. यापूर्वी दिनांक १३ मे २०२६ रोजी गुजरात राज्यातील लकतर पोलीस ठाणे येथे या प्रकरणाची प्राथमिक चौकशी झाली होती. मात्र, कारवाईच्या भीतीपोटी पीडितेने तिचे लग्न आणि शारीरिक संबंध गुजरातमध्येच झाल्याचा खोटा जबाब दिला होता. परंतु, तिच्या भावाने आणि मावशीने समजूत काढल्यानंतर तिने रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात खरा प्रकार कथन केला. विविध कलमांखाली गुन्हा दाखल रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात 'झिरो' क्रमांकाने गुन्हा नोंदवून तो पुढील तपासासाठी संगमेश्वर पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे. संशयित आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ६४(२)(ळ), ६४(२)(ा), बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (पॉक्सो - २०१२) चे कलम ४, ६, ८ तसेच बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ चे कलम ९ आणि १० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक राजाराम चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली श्रेणी पोलीस उपनिरीक्षक आर. एस. गावीत या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# ग्राहक पंचायत महाराष्ट्र चे जूलै महिन्यात पुण्यात थेऊर येथे राज्यस्तरीय अधिवेशनाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

ग्राहक पंचायत महाराष्ट्र चे संस्थापक ग्राहकतीर्थ बिंदू माधव जोशी यांच्या बरोबर मला काम करण्याची व त्यांच्या बरोबर सहवासाची संधी मला मिळाली हे माझे मी भाग्य समजतो असे सांगतानाच जूलै महिन्यात पुणे येथे राज्यस्तरीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे राज्य सचिव अरुण वाघमारे यांनी विक्रोळी कन्नमवार नगरात गुरुवारी,दि.१४ मे २०२६ रोजी दिली.संस्थेच्या मुंबई उपनगर कुर्ला तालुका येथील गेटवेल सून कार्यालयात विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती.त्याप्रसंगी अरुण वाघमारे बोलत होते.या बैठकीत राज्य सहसचिव सुरेश पाटील,एसजीआरएफ चे अध्यक्ष महेंद्र दिवाकर, मुंबई उपनगर कुर्ला तालुका अध्यक्ष संजय येवले, उपाध्यक्ष दिनेश बेरीशेट्टी, संघटक जयश्रीदिदी खिलारी, सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे, खजिनदार प्रणिता वैराळ,सल्लागार मुकुंद कुलकर्णी यांच्या सह तालुका कार्यकारिणी उपस्थित होती.

ग्राहक संरक्षण कायदा कश्या पद्धतीने तयार झाला याची सविस्तर माहिती अरुण वाघमारे यांनी देऊन त्याची अंमलबजावणी २४ डिसेंबर १९८६ रोजी झाल्याचे सांगितले.ग्राहक संरक्षणात उत्पन्नात वाढ, वितरणात समानता व उपभोगावर संयम ही तीन आयाम आहेत असे अरुण वाघमारे यांनी स्पष्ट केले.अध्यात्म आणि सामाजसेवा यांची सांगड घालून संवाद आणि कार्य यात समन्वय असला




पाहिजे असे त्यांनी अधोरेखित केले.आपल्या संस्थेच्या लेटरहेडचा योग्य वापर झाला पाहिजे याकडे त्यांनी लक्ष्य वेधले.राज्य सहसचिव सुरेश पाटील यांनी समितीमध्ये एकसंघ काम कसे असावे, कार्यकर्ता कसा असावा,कामाचे वाटप कसे करावे.ज्याची ज्या विषयात विपुणता आहे, त्याला तो विषय सोपविण्यात यावा यावर संगोपान चर्चा केली.त्यांनी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची रचना समजावून सांगितली.ग्राहकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी जाळपोळ, आंदोलन, उपोषण, इत्यादी मार्ग न अवलंबता लेखणीचा वापर करावा व तक्रार करण्यापूर्वी सर्व तपशील सांभाळून ठेवावा म्हणजे तक्रार करणे सोपे जाते याचा उहापोह सुरेश पाटील यांनी केला.महेंद्र दिवाकर यांनी ग्राहक तक्रारण निवारण मंचाची विद्युत वितरणामधील भूमिका स्पष्ट केली.कुर्ला शाखेतील सदस्य वाढीसाठी शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी सल्लागार मुकुंद कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.अखेर अध्यक्ष संजय येवले यांनी आभार मानले.

# कोणतेही पिंपळाचं झाड तोडू नये त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी, हा उपक्रम आता हजारो सांगलीकरांचा सहभाग असलेल्या ट्री आर्मीपर्यंत येऊन ठेपला आहे–आमदार सुहास बाबर

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यात एका आगळ्यावेगळ्या प्रकारच्या लष्करी शिस्तीचा हरित उठाव सुरु आहे अवघ्या सांगली जिल्ह्यात या अनोख्या उपक्रमाचा गवगवा पाहायला मिळतोय. जिल्ह्यातील तरुण आमदार सुहास बाबर यांच्या पुढाकारातून या हरित क्रांतीचं नेतृत्त्व पाहायला मिळत आहे. आडनिड्या ठिकाणी वाढलेलं पिंपळाचं झाड, तोडू नये त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी म्हणून सुरु झालेला प्रवास आता हजारो सांगलीकरांचा सहभाग असलेल्या ट्री आर्मीपर्यंत येऊन ठेपला आहे असं आमदार सुहास बाबर यांनी सांगितलं.

दिवंगत आमदार अनिलभाऊ बाबर हे मातीशी घट्ट नाळ जोडलेले पश्चिम महाराष्ट्रातील नेते होते. सांगली ग्रामीण भागातील टेंभू योजनेचे जनक असा त्यांचा सार्थ उल्लेख केला जातो. त्यांच्या पश्चात त्यांचा राजकीय वारसा मिळालेल्या सुहास बाबर यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत ७८१७८ इतके मताधिक्य घेतले तेव्हाच त्यांनी ठरवले की आमदारकीच्या काळात मताधिक्या एवढे वृक्ष मतदारसंघात लावावेत. याबाबत बोलताना आमदार सुहास बाबर म्हणाले की एका पिंपळाच्या झाडाच्या पुनर्वसनाच्या प्रेरणेतून आज मोठी हरित लोक चळवळ खानापूर आटपाडी परिसराच्या पर्यावरणात सकारात्मक बदल घडवू पाहत आहे.समाज माध्यमांवर पिंपळाची गोष्ट प्रसारित केल्यानंतर त्याला मिळालेल्या तुफान प्रतिसादातून हजारो लोकं जोडली गेली आणि दररोज जोडली जात आहेत. लोकं स्वयंप्रेरणेने जागा, पाणी, झाडं, श्रमदान करण्यासाठी पुढे येत आहेत. ट्री आर्मी असं नामकरण लोकांनीच केलं असल्याचं आमदार बाबर म्हणाले. आपल्या मातोश्रींच्या श्राद्ध दिवशी ५३०० आंब्याची कलमे रुजवल्याची माहिती त्यांनी दिली. तर विटा नागरपालिकेच्या नगरसेवकाने या उपक्रमाला प्रतिसाद म्हणून चार वर्षांची वाढलेली ५२ झाडं



भेट दिली तसेच आळसंद ग्रामपंचायतीने ५०० झाडांचे रोपण केले आहे असे ते म्हणाले.

सांगलीचे जिल्हा प्रशासन, वन विभाग यांच्या माध्यमातून एक एकर जागेत जपानी पद्धतीचा मियावकी जंगल विकसित करण्याचे निश्चित केल्याची माहिती त्यांनी दिली. गायरान जमिनीवर, रस्त्यालगत महाराष्ट्राच्या मातीत नैसर्गिकपणे उगवणारी झाडे रुजवण्याचा उपक्रम मतदारसंघात आता सुरु आहे. पूर्वी जिल्ह्यात अनेक ठिकाणी रस्त्यांवर ग्रीन टनेल वाहनचालकांना विशेषतः दुचाकीस्वारांना सावली आणि थंडावा देत पण महामार्ग आणि रस्ता रुंदीकरणामुळे हे ग्रीन टनेल नाहीसे झाले, त्याला पूर्ववत करण्याचे ध्येय ठेवल्याचे आमदार बाबर यांनी सांगितले.

येत्या ५ जून रोजी होणाऱ्या वसुंधरा दिनानिमित्त अधिक प्रमाणात वड, पिंपळ, बहावा, करंज, चिंच अशा डेरेदार वृक्षांची लागवड सुरु आहे, त्यांच्या संगोपन आणि संवर्धनासाठी ट्री आर्मी कटिबद्ध असून जिल्ह्यातील विविध व्यक्ती, व्यापारी संघटना, संस्था उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. नोकरी धंद्यानिमित्त खानापूर आटपाडीपासून दूर राहणाऱ्या लोकांना पुन्हा एकदा आपल्या गावाशी नाळ जुळवायची असेल तर सहभागी व्हावे असे आवाहनही आमदार सुहास बाबर यांनी केले.

# मुंबई लोकलमध्ये चोरांचा सुळसुळाट! एकाच दिवसात ३५ गुन्ह्यांची नोंद; ५ प्रकरणांचा छडा

## कल्याणमध्ये ड्युटीवरील पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण । २४ तासांत ९ प्रवाशांचा अपघाती मृत्यू

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई रेल्वे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात गुन्हेगारीचा आलेख वाढताना दिसत आहे. अवघ्या एका दिवसात, म्हणजेच १४ मे २०२६ रोजी रेल्वे हद्दीत तब्बल ३५ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. यापैकी ५ गुन्ह्यांची उकल करण्यात रेल्वे पोलिसांना यश आले असून, मोबाईल चोरी करणाऱ्या अनेक सराईत गुन्हेगारांना जेरबंद करण्यात आले आहे. दरम्यान, कल्याण रेल्वे स्थानकावर एका पोलीस कर्मचाऱ्यावर झालेल्या हल्ल्यामुळे रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसोबतच पोलिसांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

नोंद झालेल्या ३५ गुन्ह्यांमध्ये लोकल आणि रेल्वे स्थानक परिसरातून मोबाईल चोरीच्या २६ घटना घडल्या आहेत. याशिवाय बॅग चोरीचे ४, सोनसाखळी चोरीचा (चेन स्नॅचिंग) १, तर प्रवाशाच्या बॅगेतून रोख रक्कम आणि चांदीची नाणी चोरल्याचा १ गुन्हा दाखल झाला आहे.

रेल्वे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुर्ला, कल्याण आणि इतर रेल्वे पोलीस ठाण्यांच्या पथकांनी तातडीने कारवाई करत चोरीला गेलेले अनेक महागडे मोबाईल जप्त केले आहेत. यामध्ये एका प्रवाशाचा तब्बल ८० हजार रुपये किमतीचा 'आयफोन १५ प्लस' (iPhone 15 Plus) हस्तगत करण्यात आला असून, इतर प्रकरणांमध्ये ओप्पो, रेडमी कंपन्यांचे फोन जप्त केले आहेत. काही आरोपींना कायदेशीर प्रक्रियेनुसार नोटीस बजावून सोडण्यात आले आहे.कल्याण रेल्वे स्थानकावर कर्तव्य बजावणाऱ्या एका पोलीस कर्मचाऱ्याला सरकारी कामात अडथळा आणून बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली. आरोपीने थेट ड्युटीवरील पोलिसावर हल्ला करत त्यांना हाताने आणि लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.गुन्हेगारीसोबतच रेल्वे अपघात आणि मृत्यूचे सत्रही सुरूच आहे. १४ मे रोजी मुंबई रेल्वे आयुक्तालयाच्या हद्दीत ९ अपमृत्यू (अपघाती मृत्यू) प्रकरणांची नोंद झाली. यामध्ये चालत्या लोकलधून पडणे, रेल्वे रुळ ओलांडताना धडक बसणे, तसेच रेल्वे स्थानक परिसरात बेवारस पुरुष बेशुद्ध किंवा जखमी अवस्थेत आढळण्याच्या घटनांचा समावेश आहे. दादर, कल्याण, वाशी, लोकमान्य टिळक टर्मिनस (LTT) आणि मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस या सर्व प्रकरणांचा अधिक तपास करत आहेत.



# एसटी महामंडळाचा भोंगळ कारभार लिंबागणेश येथे एसटी बस बंद पडल्याने प्रवाशांचे हाल वाहतूक विभाग मात्र बेफिकीर-डॉ.गणेश ढवळे

**दैनिक वादळ वार्ता**
**लिंबागणेश । प्रतिनिधी**




राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक हे एसटी प्रवाशांच्या सोयीसाठी विविध योजनांचा जाहिरातीद्वारे गाजावाजा करत असताना प्रत्यक्षात मात्र प्रवाशांच्या हालअपेष्टांकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर आले आहे.

रविवार दि.१७ रोजी वसई-अंबेजोगाई ही एसटी बस सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास लिंबागणेश येथील बसस्थानकावर तांत्रिक बिघाडामुळे बंद पडली. अचानक बस बंद पडल्याने प्रवाशांचे मोठे हाल झाले असून तब्बल तीन तासांपासून प्रवासी अडकून पडले आहेत.

वाहन चालकाने तत्काळ पाटोदा आगारप्रमुखांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. मात्र मेकॅनिक रात्री ११ वाजता येईल, त्यानंतरच दुरुस्ती केली जाईल, असे उत्तर मिळाल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. विशेष म्हणजे पर्यायी बस व्यवस्था किंवा तत्काळ मदत उपलब्ध करून देण्याबाबत आगार प्रशासनाकडून कोणतीही तत्परता दाखविण्यात आली नसल्याचा आरोप प्रवाशांनी केला.दरम्यान, डॉ . गणेश ढवळे, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी बीड विभागप्रमुख अनुजा दुसाने यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधल्यानंतर त्यांनी लवकरात लवकर पर्यायी व्यवस्था करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली.

एसटी महामंडळ प्रवाशांच्या सेवेसाठी आहे की त्यांची गैरसोय करण्यासाठी, असा प्रश्न आता सामान्य नागरिक विचारू लागले आहेत. ग्रामीण भागातील प्रवाशांना तासन्तास अडकवून ठेवणे ही अत्यंत असंवेदनशील बाब आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली.

# औसा येथे समाधान शिबिर संपन्न




**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**

औसा येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान प्रशासनाच्या उद्देशाने औसा येथे शुक्रवारी समाधान शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरामध्ये नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्याने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

शिबिराचे उद्घाटन आमदार अभिमन्यू पवार यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर, शोभा पवार, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम आडसूळ, अप्पर तहसीलदार रामेश्वर स्वामी, पालिकेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे, नायब तहसीलदार सुरेश पाटील तसेच विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.या समाधान शिबिरामध्ये रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, वय व अधिवास दाखला, जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेअर दाखला, अल्पभूधारक दाखला आदी विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. नागरिकांची प्रशासकीय कामे जलद व सुलभ पद्धतीने पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न केले यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्यासाठी अशा शिबिरांची आवश्यकता अधोरेखित केली. नागरिकांनीही शिबिराच्या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले.

# सिंघम वृत्ती अन् संवेदनशील मनाचा पोलीस अधिकारी नंदकुमार गायकवाड

## सामान्य नागरिकांमध्ये निर्माण केले निर्भयतेचे वातावरण

**दैनिक वादळ वार्ता**
**वाघोली । प्रतिनिधी**

सामान्यांचा मित्र तर गुन्हेगारांचा कर्दनकाळ हे ब्रीद आपल्या कार्यातून सिद्ध करणारे वाघोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत नागरिकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत. गुन्हेगारांवर असलेली वचक आणि जनसामान्यांबद्दल असलेली संवेदनशीलता यामुळे नागरिकांमध्ये निर्भयतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाची समस्या शांतपणे ऐकून घेणे, तक्रारींवर तात्काळ दखल घेणे आणि संबंधित प्रकरणांमध्ये जलद कार्यवाही करणे, ही त्यांच्या कामाची खास ओळख ठरली आहे. अनेकवेळा कौटुंबिक वाद, महिलांवरील अत्याचार, फसवणूक, वाहतूक समस्या तसेच स्थानिक वाद अशा विविध प्रकरणांमध्ये त्यांच्या समन्वयाच्या भूमिकेमुळे नागरिकांना दिलासा मिळत आहे. त्यामुळे पोलीस म्हणजे केवळ कारवाई करणारी यंत्रणा नसून समाजाचा आधार असल्याची भावना वरिष्ठ पोलीस निरीक्षक गायकवाड यांनी अधिक दृढ केली आहे.गुन्हेगारीविरोधात त्यांनी अत्यंत कठोर भूमिका घेत परिसरातील अवैध धंदे, मादक पदार्थांची विक्री, बेकायदेशीर कृत्ये तसेच समाजविघातक प्रवृत्तींवर प्रभावी कारवाया केल्या आहेत. विशेषतः मेफेड्रॉन (एमडी) विक्री करणाऱ्या गुन्हेगारांविरोधात त्यांनी धडक मोहीम राबवत अनेक आरोपींना जेरबंद केले. या कारवायांमुळे अमली पदार्थांच्या अवैध व्यापाराला मोठा आळा बसला असून संबंधित गुन्हेगारांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे. त्यामुळे परिसरातील गुन्हेगारांनी पोलिसांची चांगलीच धास्ती घेतल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्याबरोबर शाळा, महाविद्यालय परिसरात घिरट्या घालणाऱ्या रोमियोंची वरात काढून विद्यार्थीनी, महिला यांचेमध्ये निर्भयतेचे वातावरण निर्माण केले आहे. याशिवाय त्यांनी विविध गंभीर गुन्ह्यांची उकल करत अनेक आरोपींना अटक केली आहे. चोरी, घरफोडी, जबरी चोरी, वाहन चोरी तसेच इतर गुन्ह्यांमध्ये तपासाची गती वाढवत त्यांनी गुन्हे उघडकीस आणण्यात यश मिळवले. रात्रीची गस्त, संशयितांवर बारीक लक्ष, माहिती संकलन आणि प्रतिबंधात्मक कारवाया यामुळे अनेक संभाव्य गुन्हे रोखण्यातही पोलिसांना यश आले आहे.



महिला सुरक्षा, युवकांमध्ये जनजागृती आणि वाहतूक नियंत्रण यावरही त्यांनी विशेष भर दिला आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून विविध जनजागृती उपक्रम राबवून कायद्याबाबत जागरूकता निर्माण करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. तसेच सण-उत्सव शांततेत पार पडावेत यासाठी नागरिकांशी सातत्याने संवाद ठेवत सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्याचे कामही त्यांनी प्रभावीपणे करत आहेत. कर्तव्यदक्षता, शिस्तकरत, धाडसी निर्णयक्षमता आणि जनतेप्रती असलेली संवेदनशीलता यामुळे ते नागरिकांसाठी विश्वासाचे प्रतीक आणि गुन्हेगारांसाठी खऱ्या अर्थाने कर्दनकाळ बनले आहेत.

# अपघात कमी करण्या साठी विशेष मोहीम

## अपघात प्रवण स्थळांवर वाहनांची तपासणी ४८ प्रकरणांत ६९ हजारांचा दंड




**दैनिक वादळ वार्ता**
**सेनगाव । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील वाढते अपघात रोखण्यासाठी व वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने हिंगोली जिल्हा वाहतूक शाखा व सेनगाव पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.१६) विशेष वाहन तपासणी मोहीम राबविण्यात आली.मा. पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन व अप्पर पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.सेनगाव पोलीस स्टेशन हद्दीतील अपघात प्रवण स्थळांवर वाहनांची सखोल तपासणी करण्यात आली.रिसोड रोडवरील कोळसा, वटकळी तसेच जिंतूर रोडवरील भानखेडा, हत्ता नाईक टी-पॉईंट आणि लिंबाळा तांडा टी-पॉईंट येथे ही विशेष मोहीम राबविण्यात आली. तपासणीदरम्यान ओव्हरस्पीड वाहनचालक, विनाहेल्मेट दुचाकीस्वार तसेच अवैध रेती वाहतूक करणाऱ्या टिप्पर वाहनांवर कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत एकूण ४८ प्रकरणे नोंदवून ६९ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.सदर कारवाई जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक शरद मरे यांच्या नेतृत्वाखाली वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार संदीप जाधव, सुखदेव जाधव तसेच सेनगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक मस्के, पोलीस शिपाई संतोष जाधव, गजानन कुंडकर आणि चालक परमेश्वर क्षीरसागर यांनी संयुक्तपणे पार पाडली.


# ठाण्यात 'स्व-गणना' प्रक्रियेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; १६ मेपासून प्रगणक घराघरांत!

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिकेमार्फत 'जनगणना २०२७' च्या पहिल्या टप्प्यातील स्व-गणना (Self-Enumeration) प्रक्रियेला ठाणेकरांनी प्रचंड प्रतिसाद दिला आहे. १ ते १५ मे २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या या प्रक्रियेच्या अंतिम दिवशी नागरिकांनी मोठ्या संख्येने आपली स्व-गणना पूर्ण केली. आता या मोहिमेचा पुढचा टप्पा सुरू होत असून, १६ मेपासून महापालिकेचे प्रगणक प्रत्यक्ष घराघरांत जाऊन माहिती संकलित करणार आहेत. या पार्श्वभूमीवर, महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नागरिकांना प्रगणकांना पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

**'तो' विशेष कोड प्रगणकांना दाखवणे आवश्यक**

महापालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ज्या नागरिकांनी १ ते १५ मे दरम्यान ऑनलाईन पद्धतीने आपली स्व-गणना यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे, त्यांच्या मोबाईलवर एक विशेष कोड (Verification Code) प्राप्त झाला आहे. प्रगणक जेव्हा घरी येतील, तेव्हा नागरिकांनी हा कोड त्यांना दाखविणे आवश्यक आहे. ज्यामुळे त्यांची नोंदणी त्वरित पडताळली जाईल.ज्या नागरिकांना काही कारणास्तव स्व-गणना करता आलेली नाही, त्यांनी अजिबात काळजी करण्याची गरज नाही. त्यांच्या घरी येणाऱ्या प्रगणकांना विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची अचूक व योग्य उत्तरे देऊन सहकार्य करावे.जनगणना २०२७ ची ही संपूर्ण प्रक्रिया ठाणे शहराच्या आणि पर्यायाने नागरिकांच्या भविष्यातील विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. घराघरांत जाऊन होणाऱ्या या प्रक्रियेसाठी केवळ ५ ते ७ मिनिटांचा वेळ लागतो. त्यामुळे सर्व ठाणेकरांनी या राष्ट्रीय कर्तव्यात आपले योगदान देऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.



# केज बसस्थानकात पोलीस चौकी करूनही पोलीसांच्या झोपी; चोरांचीच चौकी!

## महिला प्रवाशांचे दागिने लंपास ; पोलीस चौकी असूनही चोऱ्यांचे सत्र सुरूच;प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण

### सीसीटीव्हीचा फक्त देखावा?

बसस्थानक परिसरात बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुरू आहेत का? आणि सुरू असतील तर चोरट्यांचा माग का लागत नाही? असा प्रश्न आता नागरिक उपस्थित करत आहेत. स्थानिक तसेच बाहेरून आलेल्या सराईत महिला चोरट्यांच्या टोळ्या या परिसरात सक्रिय असल्याची चर्चा सुरू आहे.

### प्रवाशांची प्रशासनाकडे मागणी

सतत वाढणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे महिला प्रवाशांमध्ये प्रचंड भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन आणि परिवहन विभागाने तातडीने कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.बसस्थानक परिसरात चोवीस तास पोलीस गस्त वाढवावी,साध्या वेशातील पथके तैनात करावीत,सीसीटीव्ही फुटेजची नियमित तपासणी करावी,संशयित टोळ्यांवर विशेष कारवाई करावी.

### पोलीस चौकी की चोरट्यांची चौकी?

बसस्थानकात पोलीस चौकी असूनही महिला प्रवाशांचे दागिने चोरीला जात असतील, तर ही चौकी नेमकी प्रवाशांच्या सुरक्षेसाठी की चोरट्यांच्या सोयीसाठी? असा संतप्त सवाल आता जनतेतून विचारला जात आहे. खाकीचा धाक संपल्याने चोरटे दिवसाढवळ्या महिलांना लक्ष्य करत असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.




दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज येथील मध्यवर्ती बसस्थानक परिसरात महिला प्रवाशांच्या दागिने चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून, प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, बसस्थानक परिसरात पोलीस चौकी अस्तित्वात असतानाही चोरटे राजरोसपणे महिलांना लक्ष्य करत असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

केज हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणात प्रवाशांची वर्दळ असते. सध्या महिला सवलत योजनेमुळे महिला प्रवाशांची संख्या वाढली असून मंगळवार व शुक्रवारच्या साप्ताहिक बाजारामुळे बसस्थानकात प्रचंड गर्दी होत आहे. याच गर्दीचा फायदा घेत चोरट्यांच्या टोळ्या महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने, पर्समधील रोकड व मोबाईल लंपास करत आहेत.

विशेषतः बसमध्ये चढताना व उतरताना होणाऱ्या गोंधळाचा फायदा घेत काही सेकंदांत चोरी करून चोरटे पसार होत असल्याचे समोर येत आहे. अनेक महिलांना चोरी झाल्याचे बस सुटल्यानंतर किंवा घरी पोहोचल्यानंतर लक्षात येत असल्याने चोरट्यांचा शोध घेणे कठीण ठरत आहे.




### पोलीस चौकी नावा पुरतीच?

बसस्थानक परिसरात सुरक्षेसाठी उभारण्यात आलेली पोलीस चौकी केवळ नावापुरतीच असल्याचा संतप्त आरोप प्रवासी करत आहेत. चोरीच्या घटना घडत असताना अनेकदा चौकीत पोलीस कर्मचारी अनुपस्थित असतात किंवा वेळेवर मदत मिळत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. मी बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन माझ्या गळ्यातील सोन्याची पोत चोरट्याने लंपास केली. चौकीत गेल्यावर तात्काळ मदत मिळाली नाही. सार्वजनिक ठिकाणी जर महिला सुरक्षित नसतील तर आम्ही जायचे कुठे? असा संतप्त सवाल एका पीडित महिला प्रवाशाने उपस्थित केला.

### महिला सुरक्षित नसतील तर जबाबदार कोण?

महिलांच्या सुरक्षेच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जात असताना सार्वजनिक बसस्थानकातच महिला असुरक्षित असल्याचे वास्तव समोर येत आहे. चोरीच्या घटनांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण असून प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.



# माजलगावचे भूमिपुत्र डॉ.शेख सुभान हसन यांची जागतिक स्तरावर झेप

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथील रहिवासी तथा सध्या छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले डॉ. शेख सुभान हसन यांनी आपल्या सहकारी संशोधकांच्या टीमसोबत विकसित केलेल्या फोल्डेबल मल्टी-सेन्सरी इंटरॅक्टिव्ह लर्निंग असिस्टिव्ह डिव्हाइस सिस्टीम या अभिनव उपकरणाला यूके पेटंट कार्यालयाकडून मान्यता मिळाली आहे.

हे अत्याधुनिक उपकरण विशेषतः दृष्टीहीन, श्रवणदोष असलेल्या तसेच विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विकसित करण्यात आले आहे. या उपकरणाच्या माध्यमातून विद्यार्थी पाहणे, ऐकणे आणि स्पर्श करणे या तिन्ही संवेदनांच्या साहाय्याने शिक्षण घेऊ शकतात. विशेष शाळा तसेच विशेष बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांसाठी हे उपकरण अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.या उपकरणाचे वैशिष्ट्य म्हणजे ते सहजपणे फोल्ड करता येते. त्यामुळे वापरण्यास



सोपे असून प्रवासादरम्यान कमी जागतिक स्तरावर पोहोचलेल्या या यशामुळे डॉ. शेख सुभान हसन यांच्यावर कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या संशोधन आणि उपकरण निर्मितीत डॉ. शेख सुभान हसन यांच्यासह डॉ. शेख रुखसाना अजीजसाब, डॉ. बाळासाहेब किलचे, डॉ. योगेंद्र कुमार पवार, डॉ. अमरदीप असोलकर, डॉ. मीनाक्षी पाटील आणि डॉ. शुभांगी पाटील यांचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे.

# तरुण उद्योजक हरिप्रसाद नलगे यांचा प्रयाग गांडूळ खत आदर्श पॅटर्न

दैनिक वादळ वार्ता
**श्रीगोंदा । गणेश गाडेकर**

शेतीमध्ये सातत्याने होणारा रासायनिक खतांचा अतिवापर आणि जमिनीचा घसरत चाललेला पोत यावर मात करण्यासाठी सेंद्रिय शेती हाच एकमेव खात्रीशीर पर्याय उरला आहे. याच ध्येयाने प्रेरित होऊन कोलगाव (ता. श्रीगोंदा) येथील तरुण उद्योजक हरिप्रसाद कुंडलिक नलगेयांनी 'प्रयाग गांडूळ खत'प्रकल्पाच्या माध्यमातून सेंद्रिय शेतीकडे एक यशस्वी आणि आश्वासक पाऊल टाकले आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे सेंद्रिय खत उपलब्ध होत असून, जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी मोठी मदत होत आहे.

**शेतीसाठी गांडूळ खताचे महत्त्व आणि फायदे**

गांडूळ खत (वर्मीकंपोस्ट) हे जमिनीसाठी 'अमृत' मानले जाते. हरिप्रसाद नलगे यांनी या खताचे महत्त्व विशद करताना काही प्रमुख फायदे सांगितले:

जमिनीची सुपीकता वाढते:- गांडूळ खतामुळे जमिनीचा पोत सुधारतो, मातीची सेंद्रिय कर्बाची (जीसरपळल उरीलेप) पातळी वाढते आणि जमीन भुसभुशीत होते.

जलधारण क्षमतेत वाढ:- या खताच्या वापरामुळे जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता लक्षणीयरीत्या वाढते, ज्यामुळे पिकांना दुष्काळी परिस्थितीतही दिलासा मिळतो.

पिकांची जोमदार वाढ:- यात पिकांसाठी आवश्यक



असणारी नत्र, स्फुरद, पालाश (NPK) या मुख्य अन्नद्रव्यांसोबतच सूक्ष्म अन्नद्रव्ये आणि वनस्पती संवर्धक संप्रेरके मुबलक प्रमाणात असतात.

दर्जेदार आणि विषमुक्त उत्पादन:- रासायनिक खतांना फाटा देऊन गांडूळ खताचा वापर केल्यास पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. उत्पादित होणारा शेतीमाल (धान्य, फळे, भाज्या) चवदार, टिकरववीर्शीक आणि आरोग्यासाठी पूर्णपणे सुरक्षित असतो.

खर्चात बचत:- रासायनिक खतांवर होणारा भरमसाठ खर्च कमी होऊन शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च घटतो.

**तरुण उद्योजक हरिप्रसाद नलगे यांचा आदर्श पॅटर्न**

आज शेती परवडत नाही अशी ओरड तरुण वर्गातून होत असताना, हरिप्रसाद कुंडलिक नलगे यांनी मात्र 'प्रयाग गांडूळ खत' प्रकल्पाच्या माध्यमातून उद्योजकतेची एक नवी वाट दाखवून दिली आहे. केवळ स्वतःचा व्यवसाय न पाहता, परिसरातील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीकडे वळवण्यासाठी ते सातत्याने मार्गदर्शन करत आहेत.शुद्ध, दर्जेदार आणि उत्तम प्रक्रियेतून तयार केलेले 'प्रयाग गांडूळ खत' आता शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरत असून, शाश्वत शेतीसाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरत आहे. ग्रामीण भागातील तरुणांनी पारंपरिक शेतीला अशा पूरक व्यवसायांची जोड दिली, तर आर्थिक उन्नती नक्कीच साधता येईल, असा विश्वास या निमित्ताने नलगे यांनी व्यक्त केला आहे.

> “ जमीन सुपीक तर शेती शाश्वत! रासायनिक खतांमुळे होणारा जमिनीचा ऱ्हास थांबवायचा असेल, तर प्रत्येक शेतकऱ्याने गांडूळ खताचा वापर वाढवला पाहिजे. 'प्रयाग गांडूळ खत' हा केवळ एक व्यवसाय नसून, काळ्या आईचे आरोग्य जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे.
> – हरिप्रसाद कुंडलिक नलग
> (संस्थापक, प्रयाग गांडूळ खत प्रकल्प)

# लोहा शहरात 'ऑपरेशन क्रॅकडाऊन'चा धडाका निलय लॉजवर वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश!

## ३ महिलांची सुटका; दारू पार्टी करणाऱ्यांसह एकूण १० आरोपींवर गुन्हे,नियम मोडणारे इतर दोन लॉजेसही पोलिसांच्या रडारवर

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

नांदेडचे पोलीस अधीक्षक मा. श्री. अबिनाश कुमार यांच्या 'ऑपरेशन क्रॅकडाऊन' अंतर्गत लोहा शहरात पोलिसांनी शनिवारी (दि. १६ मे) सायंकाळी मोठी कारवाई केली. उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती अश्विनी जगताप व लोहा पोलीस निरीक्षक एन. एस. आयलाने यांच्या संयुक्त पथकाने 'निलय लॉज' वर छापा टाकून सुरू असलेल्या हायप्रोफाइल सेक्स रॅकेटचा पर्दाफाश केला. या कारवाईत पोलिसांनी ३ पीडित महिलांची सुटका केली असून, लॉज मालक रामकिसन विठ्ठलराव ढगे (रा. लोहा) याच्याविरुद्ध 'पिटा' कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. याच लॉजमध्ये





बेकायदेशीरपणे दारूची पार्टी झोडणाऱ्या गुलाब रशीद शेख, सोमनाथ जंगले, बालाजी जाधव, आनंद श्रीमंगले आणि शिलानंद वारकरे या ५ जणांना पोलिसांनी रंगेहाथ अटक केली. त्यांच्याकडून ३,७१० रुपयांची देशी-विदेशी दारू जप्त करण्यात आली. ग्राहकांची कोणतीही नोंद न ठेवता आणि ओळखपत्र न घेता नियमबाह्य रीतीने खोल्या भाड्याने दिल्याप्रकरणी पोलिसांनी शहरातील इतर दोन लॉजेसवरही कारवाईचा बडगा उगारला. यात 'रणवीर लॉज'चे मालक बालाजी जाधव व मॅनेजर रफिक शेख (गु.र.नं. १७३/२०२६) तसेच 'आर्या लॉज'चे मालक अजय भिसे व मॅनेजर माधव कंधारे (गु.र.नं. १७४/२०२६) यांच्यावर नवीन इछड कायदा कलम २२३, ३(५) नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.सदर धडक कारवाई पो.नि. चंद्रकांत जाधव, सोपनि केदार, पोउपनि संतोष पाटील, पोउपनि स्नेहा पिंपरखेडे यांच्यासह महिला पोलीस अंमलदार व अंमलदार किरपणे, गित्ते, कदम, गिरे, बलुरे, क्षीरसागर, घोरबांड, चौकटे आणि साजीद शेख यांच्या पथकाने केली. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल माननीय पोलीस अधीक्षक साहेबांनी संपूर्ण पथकाचे विशेष कौतुक केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077